# क्विक हीलच्या 'सीएसआर' उपक्रमाने शिक्षण संस्था, शिक्षक व विद्यार्थ्यांना केले सन्मानित



**पुणे (प्रतिनिधी) :** आजपर्यंत या उपक्रमाने २९ लाखांहून अधिक व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणला आहे आणि फक्त आर्थिक वर्ष २०२३ मध्ये प्रयत्नांमुळे पुणे विभागातील १.३ लाखांहून अधिक व्यक्तींना जागरूक केले आहे

पुणे, १३ फेब्रुवारी २०२३: क्विक हील या जागतिक सायबर सिक्युरिटी सोल्यूशन्स प्रदाता कंपनीने आपल्या सीएआर शाखेच्या माध्यमातून आज त्यांचे 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्स'चे पहिले पर्व आयोजित केले. शिक्षण संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषत: समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता पसरवलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला. क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा श्रीम. अनुपमा काटकर आणि ६ सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुणे एडिशनमध्ये पुरस्कार प्रदान करण्यात आले.

पुण्यातील चिंचवड परिसरातील केईएसच्या प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड कम्प्युटर स्टडीजमध्ये हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.

शिक्षण संस्थांमध्ये ॲग्रिकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटीचे डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स, कमला एज्युकेशन सोसायटीचे प्रतिभा कॉलेज ऑफ कॉमर्स ॲण्ड कम्प्युटर स्टडीज, एमआयटी आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज आळंदी, एमकेएसएसएसचे के. बी. इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नोलॉजी आणि पीडीईएचे अण्णासाहेब मगर कॉलेज यांचा समावेश होता. शिक्षण संस्था, शिक्षक आणि विद्यार्थी यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले, ज्यासाठी विजेते त्यांच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमात सक्रिय सहभाग दर्शवून कृती, उपक्रम आणि प्रसार प्रयत्नांचे वर्णन करणाऱ्या महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या डेटानुसार अंतिम करण्यात आले. क्विक हील फाऊंडेशन वेबसाइटवर एक समर्पित वोटिंग पेज तयार करण्यात आले, जेथे नामांकित कामगिरी व्हिडिओ क्लिप म्हणून पोस्ट केली गेली.

याप्रसंगी बोलताना क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा आणि क्विक हील टेक्नोलॉजीज लिमिटडेच्या ऑपरेशनल एक्सलन्सच्या प्रमुख श्रीम. अनुपमा काटकर म्हणाल्या, ''आमचा उद्देश–'सेक्यूरिंग फ्युचर्स' अनेक व्यक्ती आणि संस्थांच्या सामूहिक प्रयत्नांमुळेच शक्य झाले आहे. आज मी डीएससीआय, महाराष्ट्र सायबर सेल आणि स्थानिक पोलिसांसह आमच्या सर्व भागीदारांना 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमाला दिलेल्या अमूल्य पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानते.